## फास्ट न्यूज

### पद्मिनी रौतची विजयलक्ष्मीवर मात

**नवी दिल्ली:** पेट्रोलियम बोर्डाची गतविजेती व आंतरराष्ट्रीय मास्टर पद्मिनी रौतने ४३व्या राष्ट्रीय महिला प्रीमियर बुद्धिबळ चॅम्पियनशिपमधील अव्वल क्रमांक कायम राखला आहे. आठव्या फेरीत पद्मिनीने एअर इंडियाच्या विजयलक्ष्मीवर मात केली. पद्मिनीच्या खात्यात सध्या ६.५ गुण जमा असून स्पर्धेच्या तीन फेऱ्या शिल्लक आहेत. जेतेपदासाठी आठ गुणांची आवश्यकता असून दुसऱ्या क्रमांकावरील सौम्य स्वामिनाथन व इशा करवडे यांच्या व पद्मिनीच्या गुणांमध्ये एका गुणाचा फरक आहे.

### रघुनाथ कर्णधार



**बेंगळुरू:** ऑस्ट्रेलियात होणाऱ्या चौरंगी हॉकी स्पर्धेसाठी भारतीय हॉकी संघ जाहीर करण्यात आला आहे. संघाचे कर्णधारपद अनुभवी ड्रॅग फ्लिकर व्ही. आर. रघुनाथकडे सोपवण्यात आले आहे. दुखापतीमुळे कर्णधार पी. आर. श्रीजेश मालिकेला मुकणार आहे. गेल्या महिन्यात मलेशियात झालेल्या आशिया चषक स्पर्धेतील कोरियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात श्रीजेशच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. त्यामुळे तो या स्पर्धेत खेळू शकणार नाही. २३ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेमध्ये भारतासोबत ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि मलेशियाचे संघ सहभागी होणार आहेत. संघ: व्ही. आर. रघुनाथ (कर्णधार), रुपिंदरपाल सिंग (उपकर्णधार), आकाश चिकटे, अभिनव कुमार पांडे, वीरेंद्र लाकरा, कोथजितसिंग, सुरेंदर कुमार, चिंगलेसनासिंग कांगुजाम, मनप्रीतसिंग, सरदारसिंग, एस. के. उथप्पा, तलविंदरसिंग, निक्कीन थिमय्या, अफ्फान युसूफ, महम्मद आमीर खान, सतबिरसिंह, आकाशदीप सिंग.

### ब्राझिलची अर्जेंटिनावर मात

**बेलो हॉरिझाँट:** फुटबॉल वर्ल्डकप प्राथमिक फेरीत शुक्रवारी ब्राझिलने पारंपरिक प्रतिस्पर्धी अर्जेंटिनाला ३-० अशा गोलफरकाने नमवले. ब्राझिलचा आघाडीचा खेळाडू नेमारने या सामन्यात गोल करून आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील गोलचे अर्धशतक साजरे केले. नेमारचा हा ७४ सामन्यांमधील पन्नासावा आंतरराष्ट्रीय गोल ठरला. ब्राझिलतर्फे ५० गोल पूर्ण करणारा २४ वर्षीय नेमार हा चौथा खेळाडू ठरला. याआधी ब्राझिलच्या पेले (७७ गोल), रोनाल्डो (६२ गोल) आणि रोमारिओ (५५ गोल) यांनी ही कामगिरी केली आहे.

### फुटबॉलपटूंवर बंदी

**पणजी:** शिस्तभंगामुळे अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनने (एआयएफएफ) एफसी गोवा संघाच्या दोन आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटूंवर दोन सामन्यांची बंदी घातली आहे. एआयएफएफच्या शिस्तपालन समितीने ब्राझिलियन डीफेंडर रफाएल दुमास आणि ल्युशियानो सब्रोसा यांच्यावर बंदी घातली. गेल्या केरळ ब्लास्टर्सविरुद्धच्या सामन्यात या दोघांनी गैरवर्तन केले होते.

# चोख प्रत्युत्तर

## भारत ४/ ३१९; विजय, पुजाराची शतके

**वृत्तसंस्था,** राजकोट

मुरली विजय आणि चेतेश्वर पुजाराच्या शतकांमुळे भारताने मालिकेतील पहिल्या कसोटीत पहिल्या डावात ४ बाद ३१९ धावा करून इंग्लंडला चोख प्रत्युत्तर दिले. तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा विराट कोहली २६ धावांवर खेळत होता. भारतीय संघ अद्याप २१८ धावांनी पिछाडीवर आहे. सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सुरू असलेल्या या लढतीत शुक्रवारी मुरली विजय आणि गौतम गंभीर यांनी बिनबाद ६३ वरून पुढे खेळायला सुरुवात केली. सकाळच्या सत्रातील दुसऱ्याच षटकात १००वा कसोटी सामना खेळत असलेल्या स्टुअर्ट ब्रॉडने गंभीरला पायचीत टिपले. यानंतर घरच्या मैदानावरील पदार्पणाची कसोटी खेळायला चेतेश्वर पुजारा आला. त्याचा खेळ पाहण्यासाठी त्याची पत्नी आणि वडील दोन्ही आले होते. त्यामुळे पुजारासाठी ही लढत प्रतिष्ठेची झाली होती.

तिसऱ्या दिवशी राजकोटच्या खेळपट्टीवर फलंदाजी करणे आव्हानात्मक ठरेल, असा अंदाज होता. मात्र, मुरली विजय-पुजाराने आपल्या शैलीदार फलंदाजीने इंग्लंडच्या गोलंदाजांची परीक्षा बघितली. या दोघांनी खेळपट्टीचे कुठलेही दडपण घेतले नाही. चांगल्या चेंडूचा 'सन्मान' आणि खराब चेंडूला 'शिक्षा' अशी योजना या जोडीने आखली. खेळपट्टीकडून गोलंदाजांना मदतच मिळत नव्हती, असे नव्हते. चेंडू अचानक उसळत होता, तर काही वेळा खाली राहत होता. त्यामुळे गोलंदाज आणि फलंदाज दोघांनीही संयम राखणे महत्त्वाचे होते. ख्रिस वोक्सचा पहिल्या सत्रातील पहिला स्पेल तर जबरदस्त होता. त्याचे दोन बाउन्सर पुजाराच्या हेल्मेटला, तर एक बाउन्सर पोटाला लागला. पण नशिबाने पुजाराला दुखापत झाली नाही. पुजाराने मात्र संयम राखला. वोक्सने पहिल्या पाच षटकात अवघ्या ६ धावा दिल्या. यात मुरली विजयने अतिशय सावध फलंदाजी केली.

उपाहारापर्यंत भारताने १ बाद १६२ धावांपर्यंत मजल मारली होती. उपाहारानंतर हसीब हमीदने मुरली विजयला झेलबाद करण्याची संधी सोडली. यावेळी विजय ६६ धावांवर खेळत होता. यानंतर अन्सारीने पुजाराला ८६ धावांवर असताना पायचीत टिपले होते. मैदानावरील पंचांनी पुजाराला बादही ठरवले. पुजाराने मुरली विजयचा सल्ला घेऊन 'डीआरएस'चा उपयोग करण्याचे ठरविले. 'बॉल ट्रॅकिंग'नुसार चेंडू यष्ट्यांच्या वरून जात असल्याचे स्पष्ट झाले आणि पुजाराला जीवदान मिळाले. या वेळी पुजाराच्या पत्नी आणि वडिलांच्या चेहऱ्यावरील आनंद बघण्यासारखा होता. मुरली विजय ८६ धावांवर असताना इंग्लंडने रिव्ह्यू घेतला. पण तिसऱ्या पंचांनी विजयला नाबाद ठरविले.

पुजाराला शतकासाठी एका धावेची गरज असताना इंग्लंडने नवीन चेंडू खेतला आणि नवीन चेंडू ख्रिस वोक्सकडे सोपविला. वोक्सच्या तिसऱ्या चेंडूवर एक धाव घेऊन पुजाराने शतक पूर्ण केले. मुरली विजयने अलीला षटकार खेचला आणि यानंतर ब्रॉडला सलग दोन चौकार ठोकून शतक पूर्ण केले. स्टोक्सला विजय-पुजाराची जोडी फोडण्यात यश आले. पुजारा २०६ चेंडूंत १७ चौकारांसह १२४ धावा काढून बाद झाला. विजय-पुजारा जोडीने दुसऱ्या विकेटसाठी २०९ धावांची भागीदारी केली. मुरली विजयने कोहलीसह ४१ धावा जोडल्या. अवघ्या काही षटकांचा खेळ शिल्लक असताना रशिदने मुरली विजयचा अडसर दूर केला. या वेळी हमीदला मुरली विजयचा झेल टिपण्यात यश आले. मुरली विजयने ३०१ चेंडूंत ९ चौकार व ४ षटकारांसह १२६ धावा केल्या. 'नाइट वॉचमन' म्हणून अमित मिश्राला पाठविण्यात आले. मात्र, मिश्राने निराशा केली.

**स्कोअरबोर्ड:** इंग्लंड ५३७ वि. भारत ४ बाद ३१९ (विजय १२६, गंभीर २९, पुजारा १२४, कोहली खेळत आहे २६; ब्रॉड २०-७-५४-१, झफर अन्सारी १७.३-१-५७-१, आदिल रशिद १६-१-४७-१, बेन स्टोक्स १०-१-३९-१).



# कसोटी जिंकण्याचा पुजाराला विश्वास

**राजकोट :** भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीतील पहिल्या डावात सुरुवात तर दमदार केली; पण शेवट मात्र मनासारखा झाला नाही. शेवटच्या काही षटकांत भारताने दोन विकेट झटपट गमावल्या. कसोटीचे दोन दिवस अद्याप शिल्लक आहेत. भारतीय संघ अद्याप २१८ धावांनी पिछाडीवर आहे. तरीही ही कसोटी भारतीय संघ जिंकू शकतो, असे विश्वास शतकवीर चेतेश्वर पुजाराने व्यक्त केला.

दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत पुजारा म्हणाला, 'इंग्लंडने ५३७ धावा फलकावर लावल्या आहेत. त्यामुळे आम्हालाही तशीच फलंदाजी करावी लागणार आहे. त्यामुळे पहिले लक्ष्य म्हणजे एवढ्याच धावा फलकावर लावायच्या. चौथ्या दिवशी आम्ही चांगली फलंदाजी केली, तर ही लढत जिंकू शकतो.' पुजाराने १२४ धावांची खेळी केली. पुजारा म्हणाला, 'चौथ्या दिवशी चेंडू वळायला लागणार आहे. त्यामुळे पाचव्या दिवशी फलंदाजी करणे अवघड होईल. आताच याबाबत मला अधिक काही बोलायचे नाही.' या स्टेडियममध्ये पुजाराने फर्स्ट क्लास क्रिकेटमधील तिहेरी शतक ठोकले आहे. पुजारा म्हणाला, 'आम्ही अद्याप चांगल्या स्थितीत आहोत. आम्ही ६० -७० धावांची आघाडी मिळवली, तर दुसऱ्या डावात त्याचा आम्हाला फायदाच होईल. तूर्तास आमचे पहिले लक्ष्य आहे ते पाचशे धावांचा टप्पा ओलांडण्याचे. त्यानंतर लढत जिंकण्याचे ठरविले आहे.' पुजाराने मुरली विजयसह द्विशतकी भागीदारी केली. तामिळनाडूच्या मुरली विजय सोबतच्या या भागीदारीबाबत विचारले असता पुजारा म्हणाला, 'यालाच तर सुसंवाद म्हणतात. आम्ही अनेक वर्षांपासून एकत्र कसोटी खेळत आहोत. आम्ही दोन्ही इतर प्रकारापेक्षा कसोटीतच खेळतो. आम्हाला एकमेकांच्या जमेच्या बाजू माहिती आहेत.'

राजकोट येथे आपण अनेक देशांतर्गत सामने खेळलो आहोत. असे असले तरी या लढतीपूर्वी माझ्याही पोटात गोळा आला होता. कारण माझ्या कुटुंबीयातील सदस्य आणि जवळचे मित्र ही लढत बघण्यासाठी आले होते. लढत बघायला आलेल्या लोकांनाही माझ्याकडून अपेक्षा होत्या. मी मात्र स्वत:ला या गोष्टींचा विचार करायचा नाही, असे बजावत होतो. मला माझ्या खेळावर लक्ष केंद्रित करायचे होते, असे पुजाराने सांगितले. चेंडू फ्रन्ट पॅडला लागला नव्हता, तर रेअर पॅडला लागला असल्यानेच रिव्ह्यू वापरण्याचा विचार केल्याचे पुजाराने सांगितले.

### 'शेवटच्या दोन विकेटनी विश्वास वाढला'

'लढतीतील आमचे पारडे जड आहे, असे मी म्हणत नाही आहे. पण शेवटच्या दोन विकेटनी आमच्या खेळाडूंचा आत्मविश्वास नक्कीच उंचावला आहे. शेवटच्या दोन विकेट या आमच्यासाठी बोनसच होत्या. संपूर्ण दिवस आमच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा केला,' असे मत इंग्लंडचे सहायक प्रशिक्षक पॉल फॅब्रासने व्यक्त केले. अद्याप लढतीचे दोन दिवस शिल्लक आहेत. पण दोन्ही शतकवीरांना बाद केल्याचा आनंद आहे. आम्ही आमच्या योजनांवर ठाम राहिलो आणि संयम राखला. त्याचेच फळ आम्हाला दिवसाच्या शेवटी मिळाले. गोलंदाजांसाठी ही आव्हानात्मक खेळपट्टी होती. पण आमच्या गोलंदाजांनी कौतुकास्पद मारा केला, असेही पॉल म्हणाले.

# एफसी गोवाचा झुंजार विजय

**मडगाव:** स्टॉपेज टाईममध्ये रोमिओ फर्नांडिसने नोंदविलेल्या गोलमुळे शेवटची १८ मिनिटे दहा खेळाडूंसह खेळूनही एफसी गोवा संघाने इंडियन सुपर लीग (आयएसएल) फुटबॉल स्पर्धेत झुंजार विजय मिळविला. शुक्रवारी पार पडलेल्या लढतीत त्यांनी नॉर्थईस्ट युनायटेडवर २-१ असा विजय मिळवून पहिल्या टप्प्यातील पराभवाची परतफेड केली.

फातोर्डा येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर शुक्रवारी पार पडलेल्या सामन्यात गोलशून्य पूर्वार्धानंतर तिन्ही गोल उत्तरार्धाच्या खेळात झाले. सामन्याच्या ५०व्या मिनिटाला सेईत्यासेनसिंगने नॉर्थईस्टला आघाडी मिळवून दिली, तर ६२व्या मिनिटास रॉबिनसिंगने एफसी गोवा संघाला बरोबरी साधून दिली. ७२व्या मिनिटाला सामन्यातील दुसऱ्या यलो कार्डमुळे साहिल तावोराला रेड कार्ड मिळाले. त्यामुळे अखेरच्या १८ मिनिटांत एफसी गोवाला दहा खेळाडूंसह खेळावे लागले. संघाचे नेतृत्व करणारा गोलरक्षक लक्ष्मीकांत कट्टीमनी याची दक्ष कामगिरीही एफसी गोवासाठी मौल्यवान ठरली. तोच सामन्याचा मानकरी ठरला. चार मिनिटांच्या स्टॉपेज टाईममध्ये रॉबिनसिंगच्या असिस्टवर रोमिओने गोलबरोबरीची कोंडी फोडली.

संजय बालमुचूने दिलेल्या चेंडूवर रॉबिनसिंगने खोलवर चढाई केली. त्यानंतर रोमिओकडे चेंडू पास केला. रोमिओने गोलरक्षक सुब्रत पॉलला चकवा देत शांतपणे एफसी गोवाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

गुवाहाटी येथे स्पर्धेतील पहिल्या टप्प्यात नॉर्थईस्टने एफसी गोवाला २-० असे हरविले होते. आजच्या विजयाच्या पूर्ण तीन गुणांमुळे एफसी गोवाचे १० गुण झाले. त्यांचा हा दहा सामन्यांतील तिसरा विजय ठरला.

गोलसरासरीवर त्यांना आठव्या क्रमांकावर राहावे लागले आहे. नॉर्थईस्ट युनायटेडला सलग चौथा पराभव पत्करावा लागला.

पाचव्या पराभवामुळे त्यांचे नऊ सामन्यानंतर १० गुण आणि सहावे स्थान कायम आहे.



गोव्याचे रॉबिनसिंग व रोमियो फर्नांडिस

# शिवम नायरचे ७ बळी

**मुंबई :** १६ वर्षांखालील मुलांच्या हॅरिस शिल्ड क्रिकेट स्पर्धेत शिवम नायरने घेतलेल्या सात बळींमुळे बॉम्बे स्कॉटिश शाळेने एस. के. जैन शाळेला १०५ धावांनी पराभूत करत विजयी सलामी दिली. बॉम्बे स्कॉटिशने १३५ धावा केल्या होत्या तर जैन शाळेला केवळ ३० धावांपर्यंतच मजल मारता आली. अन्य एका सामन्यात चॅम्पियन्स स्कूलने शारदाश्रम इंग्लिशविरुद्ध २७ धावा केल्या आणि त्यांना पराभव सहन करावा लागला. त्यात विनायक चव्हाणने ५ बळी घेतले. सर जेजे बॉइजच्या जाबर साजीदने घेतलेल्या ६ बळींमुळे बीकेएम हायस्कूलला पराभव सहन करावा लागला. गोपी बिर्लाने शारदाश्रम मराठीवर २३३ धावांनी मोठा विजय मिळविला. त्यात कडाकियाच्या ५२ धावा आणि निसर्ग पटेलच्या ३ बळींचा मोठा वाटा होता. अंजुमन इस्लाम शाळेने व्हीपीएमच्या बीआर. इंजिनिअरिंग इंग्लिश हायस्कूलवर ६४ धावांनी विजय मिळविला. त्यात शेख मोहम्मद व कुमार प्रमोद यांनी प्रत्येकी ४ बळी घेतले.

अन्य एका सामन्यात ख्राइस्ट चर्च शाळेचा डाव केवळ ४० धावांत आटोपला. पल्लव दांडेकरने त्यात ७ बळी घेतले. सेंट पॉल शाळेने ही धावसंख्या १० विकेट राखून पार केली.

# दिल्लीसाठी मलुदा सर्वस्व

**ल्युशियो**

इंडियन सुपर लीगसाठी आणखी एक उत्साहवर्धक असा आठवडा होता. दिल्ली डायनामोजने मिळालेल्या संधीचा फायदा उचलत केरळ व चेन्नईन यांच्यावर विजय मिळविला. या विजयांमुळे ते १६ गुणांसह अव्वलस्थानी विराजमान झाले. फ्लोरेन्ट मलुदाने आपण दिल्लीच्या संघाचे आधारस्तंभ कसे हे गेल्या काही सामन्यांत सिद्ध केले आहे. मैदानावर खेळत असताना नेता म्हणून त्याचा वावर लक्षणीय आहे. त्याला मार्सेलिनो, कीन लेविस व गॅडझ यांची छान साथ लाभत आहे. त्यामुळे या स्पर्धेत ते आघाडीवर का आहेत याचे उत्तर आपोआपच सापडते. यानंतर आणखी एका संघाचा आपण उल्लेख करू शकतो तो म्हणजे पुणे सिटी. त्यांनी गुणतक्त्यात पहिल्या चारात स्थान मिळविले आहे. त्यांनी मिळविलेले विजय हे मेहनत आणि जिद्द यांचे उदाहरण म्हणता येईल. गोव्याचा विचार केला तर आम्ही नऊ सामने खेळलो आहोत आणि आणखी पाच सामने खेळायचे आहेत. यातील प्रत्येक सामना आमच्यासाठी अंतिम सामनाच असेल. यंदाचा हंगाम हा आमच्यासाठी खूप कष्टप्रद ठरला आहे. तरीही आमच्या संघावर विश्वास आहे. जर बाद फेरीसाठी पात्र ठरण्याचा थोडासा विश्वासदेखील आमच्यापाशी असेल तर आम्ही ती कामगिरी नक्कीच करून दाखवू. खेळाडूंच्या होत असलेल्या बैठकांमध्ये आम्ही सामना अनिर्णीत ठेवण्याची चर्चा कधीही करत नाही तर सामना कसा जिंकता येईल, यालाच प्रथम प्राधान्य असते.

**(गेमप्लान)**

SEAGRAM'S
IMPERIAL BLUE
Music CDs

# श्रीकांतचे ध्येय: 'अव्वल आठ'

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

दुखापतींमधून सावरत भारताचा आघाडीचा बॅडमिंटनपटू किदाम्बी श्रीकांत मकाऊ ओपन बॅडमिंटन स्पर्धेतून पुनरागमन करत आहे. दुखापतीतून सावरत पुन्हा सुरुवात करताना पहिल्या काही स्पर्धा आत्मविश्वास दुणावण्यासाठी महत्त्वाच्या ठरतील, असे श्रीकांतचे म्हणणे आहे. आधी अव्वल दहा अन् मग अव्वल आठमध्ये पुन्हा धडक मारण्याचे ध्येय त्याने समोर ठेवले आहे. त्याचे कारकिर्दीतील सर्वोच्च रँकिंग राहिले आहे ते तीन. पण सध्या तो १३व्या क्रमांकावर घसरला आहे. भविष्यात त्याला तीनच्याही पुढे जायचे आहेच; पण त्यासाठी मेहनत करावी लागणार याचीही त्याला कल्पना आहे. रिओ ऑलिम्पिकच्या उपांत्यपूर्व फेरीतपर्यंत मजल मारल्यानंतर श्रीकांत जपान सुपर सीरिजमध्ये खेळला; पण स्पर्धेदरम्यान त्याच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली अन् थोडावेळ त्याला बॅडमिंटनपासून दूर राहावे लागले.

'दुखापत खूप मोठी नव्हती; पण आता सावरलो असून मकाऊ स्पर्धेत खेळणार आहे. याच आठवड्यात मी सरावाला सुरुवात केली. या दरम्यान दुखापतीमुळे चीन व हाँगकाँग स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला. दुखापतीतून सावरलोय म्हणून खेळ व ट्रेनिंगमधील वेग वाढवत मला घाई करायची नाही', असे श्रीकांत म्हणतो. २०१४मध्ये चीन ओपन व २०१५मध्ये इंडियन ओपन स्पर्धा जिंकून त्याने बॅडमिंटन विश्वाला आपली दखल घ्यायला लावली. 'सामन्याच्या अखेरपर्यंत चमकदार खेळ करणे मध्यंतरी मला जमत नव्हते. हा कमकुवत दुवा आता सुधारतो आहे. खरेतर सर्वोच्च स्तरावर सातत्याने यश मिळवणे कठीण असते. त्यासाठी सतत मेहनत करावी लागते. मी तेच करतो आहे', असे श्रीकांतने सांगितले.

गप्पांमध्ये रँकिंगचा विषय निघतो. 'रँकिंगचा मी खूप विचार करत नाही. सध्या तरी यशस्वी पुनरागमन करण्याकडे लक्ष लागले आहे. या सुरुवातीच्या स्पर्धांमध्ये माझी कामगिरी साजेशी झाली व मी स्पर्धांमध्ये दूरवर मजल मारली तर अव्वल आठमध्ये परतण्याची संधी आहे', सध्या रँकिंगमध्ये १३व्या क्रमांकावर असलेला श्रीकांत नमूद करतो.



### ऑलिम्पिक पराभवातून सावरायला वेळ लागला...

रिओ ऑलिम्पिक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व सामन्यात श्रीकांतला चीनचा महान बॅडमिंटनपटू लिन डॅनकडून पराभव पत्करावा लागला. या पराभवातून सावरला आहेस का? या प्रश्नाचे उत्तर देताना श्रीकांत सुरुवातीला थोडा भावनिक होतो. 'हो, थोड्याफार प्रमाणात बाहेर पडलो आहे', असे एका ओळीत उत्तर दिल्यावर काहीसा सावरत श्रीकांत म्हणतो, 'प्रत्येक मोसमात आम्ही सुपर सीरिजच्या १२ स्पर्धांमध्ये भाग घेतो. या स्पर्धांमधील पराभवांमधून आम्ही बऱ्यापैकी लवकर सावरतो, कारण पुढील स्पर्धा पुढच्याच आठवड्यात येते. तसेच पराभूत झालेली स्पर्धा पुढील वर्षीदेखील येणार हे ठाऊक असते. ऑलिम्पिकचे तसे नसते. हा क्रीडामेळा चारवर्षांनी एकदाच भरतो. या स्पर्धेसाठी मेहनत करताना आम्ही रात्रीचा दिवसही करतो. अशावेळी पदकाच्या जवळ येऊन हार मानावी लागल्याने मी दुखावलो. थोडक्यात विजय हुकल्याने हार पचवणे जड जात होते. तेव्हा काही काळ तरी कुणाशी बोलायचेच नाही असे मी ठरवले. थोडावेळ सगळ्यांपासून दूर राहिलो'. आता मात्र श्रीकांत सावरला आहे. खेळात असे यश अपयश येतेच हे त्याला पटले आहे. म्हणून पुनरागमनावर त्याचे लक्ष लागले आहे.

हवाई अधिभार : गोवा मार्गे १ रुपया, इंदूर, चेन्नई मार्गे ३ रुपये, अहमदाबाद, बंगलोर, कोची, कोइम्बतूर, एर्नाकूलम, हैदराबाद, कोझिकोड, मंगळूर, त्रिवेंद्रम, उदयपूर, विझागमार्गे ४ रुपये, दिल्ली, कोलकाता मार्गे ५ रुपये.
रस्ते अधिभार : रु. २.०० (बलसाड जिल्हा, सिल्वासा, दमण, इंदौर ही शहरे वगळून.)
वर्ष : ५५ अंक : १२४
बेनेट, कोलमन अँड कंपनी लि.च्या वतीने आर. कृष्णमूर्ती, यांनी टाइम्स ऑफ इंडिया इमारत, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१ येथे प्रकाशित केले व १) द टाइम्स ऑफ इंडिया सबर्बन प्रेस, आकुर्ली रोड, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, कांदिवली (पू), मुंबई - ४०० १०१, फोन (०२२) २८८७२३२४, २८८७२९३०, फॅक्स - (०२२) २८८७४२३०. २) द टाइम्स ऑफ इंडिया प्रिंट सिटी, प्लॉट नं. ४, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८. फोन (०२२) २७६०९९९९, फॅक्स - (०२२) २७६०५२७५ येथे मुद्रित केले. © सर्वाधिकार सुरक्षित, प्रकाशकांच्या लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुनर्प्रकाशनास बंदी.
कार्यकारी संपादक : अशोक पानवलकर, संपादक : श्रीकांत बोजेवार* (मुंबई आवृत्ती) (*पीआरबी कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार)
नोंदणी क्र. एमसीएस/०६३/२०१५-१७. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.

**GODFREY PHILLIPS INDIA LIMITED**

**CIN: L16004MH1936PLC008587**

**website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com**

**Extract of Standalone Unaudited Financial Results for the Quarter and Half Year ended 30th September, 2016**

(Rs. in lakhs)

| Sl. No. | Particulars | Quarter ended 30.09.2016 | Half year ended 30.09.2016 | Quarter ended 30.09.2015 |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 102054 | 196110 | 103122 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 2979 | 5860 | 7709 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 2979 | 5860 | 7709 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 1970 | 4208 | 5279 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 1903 | 4074 | 5140 |
| 6 | Equity Share Capital | 1040 | 1040 | 1040 |
| 7 | Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (Rs.) | 3.79 | 8.09 | 10.15 |

Notes :

1. The above is an extract of the detailed format of Statement of Standalone Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The detailed financial results and this extract were reviewed by the Audit Committee and approved at the meeting of the Board of Directors of the Company at the meeting held on November 11, 2016. The full format of the Statement of Standalone Unaudited Financial Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).

2. A Limited Review as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 has been completed on the detailed financial results for the Quarter and Half Year ended 30th September, 2016 and the Limited Review Report of the Auditors has been filed with the Stock Exchanges. This Report does not have any impact on the 'Results and Notes' for the Quarter and Half Year ended 30th September, 2016 which needs to be explained.

**Registered Office:** 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033.

**For and on behalf of the Board**
**Sd/-**
**(K.K. Modi)**
**Managing Director**

**Place : New Delhi**
**Dated: 11th November, 2016**